# पेप्सीकोच्या माऊन्टेन ड्यूच्या प्रसार मोहिमेसाठी खेळाडू करारबद्ध



पेप्सीको इंडियाने माऊन्टेन ड्यू या आपल्या नवीन शीतपेय उत्पादनासाठी डर को मारो ड्यू ही प्रसार मोहीम सुरू केली आहे. भीतीशी लढा देत विजय मिळविण्याच्या प्रेरणेचा उत्सव साजरा करताना ही मोहीम करण्यात आली आहे. ही मोहीम करण्यासाठी माऊन्टेन ड्यूने बॉक्सिंग चॅम्पियन विजेंद्र सिंग, जागतिक मुष्ठीयोद्धा सुशील कुमार व भारतीय हॉकी खेळाडू संदीप सिंग यांना करारबद्ध केले होते. या माध्यमातून ग्राहकांना भारतातील या अव्वल खेळाडूंबरोबर एक दिवस प्रशिक्षण घेण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली होती. विजेंद्र सिंग आणि सुशीलकुमार हे दोघेही माऊन्टेन ड्यूच्या डर को मारो ड्यू ऑन एअर प्रसार मोहिमेमध्ये जिंकण्यासाठी भीतीवर मात करत असल्याचे उपस्थितांना पाहायला मिळाले.